# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.

दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.

ई-मेलः **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट- www.mercindia.org.in

## प्रसिध्दी पत्रक

### भार नियमनाचे तास वाढविण्यासंबंधीच्या महावितरण कंपनीच्या प्रस्तावाबाबत

विजेच्या मागणी व पुरवठ्यातील तूट ६५०० ते ७००० मेगावॅट पर्यंत वाढल्याने ही तफावत कमी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण कंपनी)ने भार नियमनाच्या तासांमध्ये वाढ करण्यास मंजूरी देण्यासाठी आयोगाकडे प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावावर मुंबई येथे दिनांक १६ एप्रिल, २००७ रोजी आयोगाने सुनावणी घेतली.

२ आयोगाने, याबाबतीत दिनांक २३ एप्रिल, २००७ रोजी आदेश निर्गमित केला आहे. या आदेशाची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेतः-

(१) महावितरण कंपनी, महापारेषण कंपनी आणि राज्य भार प्रेषण केंद्र यांचे सततचे बदलते दावे व आकडेवारी लक्षात घेता, आयोगाने यापूर्वीच जारी केलेल्या भार नियमनाच्या कार्यपध्दतीत कोणताही फेर-बदल करण्याचे समर्थनीय ठरत नाही.

(२) आयोगाच्या दिनांक २० फेब्रुवारी, २००७ च्या आदेशातील कार्यपध्दतीस अनुसरुन, भार नियमनाचे जास्तीत जास्त तास हे खालील तक्त्यात दाखविल्याप्रमाणेच राहतील, याची महावितरण कंपनीने खात्री करावीः-

| वर्गवारी | नागरी व औद्योगिक वस्त्या | अन्य विभाग | शेती प्रभावित विभाग |
|---|---|---|---|
| अ | ४.५ | ६.५ | १४ |
| ब | ५ | ७ | १४.५ |
| क | ५.५ | ७.५ | १५ |
| ड | ६ | ८ | १५ |

टीप- वर उल्लेखलेले तास हे भार नियमनाची मर्यादा दर्शविणारे असून, विजेची मागणी-पुरवठ्यातील तफावत जेव्हा कमी होईल तेव्हा वरील विभागातील भार नियमनाचा कालावधी हा १:१.४:२.८ या प्रमाणात कमी करावा.

(३) राज्यातील उर्वरित जनतेकरिता भार नियमनाचे तास वाढवावे लागले तरी चालेल, परंतु औद्योगिक ग्राहकांकरिता मात्र आठवड्यामध्ये आणखी एक सुट्टी लागू करावयाची नाही, असा महावितरण कंपनीचा दृष्टिकोन आयोगास मान्य नाही. राज्यातील विजेच्या मागणी व पुरवठ्यातील तूटीने आपत्कालिन अशी मर्यादा गाठली असल्याने, ग्राहकांच्या सर्व वर्गवारींनी आणि विभागांनी भार नियमनातील त्यांचा वाटा उचलणे आवश्यक झाले आहे.

(४) जर औद्योगिक विभाग आणि फीडर्सनी विजेचा वापर विहीत मर्यादेत केला नसेल तर, एक्स्प्रेस फीडर्सना न जोडलेल्या उद्योगांना दुसरी सुट्टी महावितरण कंपनीने लागू करावी. तथापि, अतिरिक्त वीज पुरवठा उपलब्ध झाल्यास आणि शेती प्रभावित क्षेत्रातील भार नियमन १२ तासाच्या मर्यादेपर्यंत खाली आल्यास औद्योगिक ग्राहकांना दुसरी सुट्टी लागू करण्याची गरज भासणार नाही.

(५) टीपीसी आणि मुंबईतील परवानेधारकांनी लक्षणीय जादा वीज खेचली नसल्याचे राज्य भार प्रेषण केंद्राने स्पष्ट केले आहे. टीपीसीने जादा खेचलेली एकूण वीज बरीच कमी आहे; इतकेच नाही तर काही दिवशी टीपीसीने तिच्या वाट्यापेक्षाही कमी वीज घेतली असून त्याचा लाभ महावितरण कंपनीला झाल्याचे राज्य भार प्रेषण केंद्राने सादर केलेल्या आकडेवारीवरुन दिसून येते.

(६) महावितरण कंपनी आणि मुंबईतील परवानेधारक यांच्यातील स्टॅन्ड-बाय करार हा आणीबाणीच्या परिस्थितीकरिता असून सर्वसाधारण परिस्थितीमध्ये वीज घेण्यासाठी तो नाही. त्यामुळे पुरेशा वीज पुरवठ्याकरिता आवश्यक ते करार करण्याची खबरदारी मुंबईतील परवानेधारकांनी घेतली पाहिजे. आवश्यकतेपेक्षा कमी वीज उपलब्ध झाल्यास, मुंबईतील परवानेधारकांना आप-आपल्या परवाना क्षेत्रात भार नियमन करावे लागेल.

(७) वीज खरेदीच्या प्रमाणात कपात करण्यात आल्यामुळे वीज खेचण्याची समस्या निर्माण झाली आहे. फेब्रुवारी, २००७ मध्ये देखील कमी वीज खरेदी केल्यामुळे अशीच समस्या उभी राहीली होती. त्यावेळी

महावितरण कंपनीला अति उच्च-दाबाचा पुरवठा अनेकदा बंद करणे भाग पडले होते. त्याचा परिणाम म्हणून आयोगालादेखील भार नियमनाच्या तासांची मर्यादा १२ तासांहून १५ तासांपर्यंत वाढवून भार नियमनाच्या कार्यपध्दतीत सुधारणा करणे भाग पडले होते.

(८) या अनुभवापासून कोणताही धडा न घेतल्यामुळे महावितरण कंपनीने, १ एप्रिल, २००७ पासून कमी वीज खरेदी करण्याची चूक पुन्हा केल्याचे, दिसून येते. वीज खरेदी करण्याचे करार ३१ मार्च, २००७ पर्यंतच अंमलात राहणारे आहेत हे आधीच माहित होते. तरीही एप्रिल, २००७ करिता विजेच्या खरेदीसाठी दिनांक ३ एप्रिल रोजी, इतक्या उशिरा, नव्याने निविदा मागवल्या. त्या १७ एप्रिल २००७ रोजी उघडण्यात आल्या. याद्वारे महावितरण कंपनीने बेजबाबदार वर्तणूकीचे प्रदर्शनच केले आहे.

(९) उपलब्ध विद्युत निर्मिती क्षमतेतील मोठ्या चढ-उतारांमुळे तसेच वारंवार बिघाडांमुळे प्रत्यक्ष निर्मितीत सतत व्यत्त्यय येऊ लागल्याने महानिर्मिती कंपनीची कामगिरी अपेक्षेपेक्षा खूपच खराब झाली असल्याचे दिसून येते. परिणामी वीज निर्मिती कमी होऊन वीज मागणी व पुरवठ्यातील तफावतही आणाखी वाढली. याशिवाय, नवीन पारस व नवीन परळी प्रकल्प सुरू होण्यास आजतागायत ९ महिन्यांचा विलंब झाला असूनही या प्रकल्पांद्वारे पूर्ण क्षमतेइतकी वीज निर्मिती कधी सुरु होणार आहे, ते अद्यापही स्पष्ट होत नाही.

(१०) महानिर्मिती कंपनीची बेभरवशाचाची वीज निर्मिती, रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट लिमिटेडचा प्रकल्प आणि इतर प्रकल्पांची अनिश्चितता विचारात घेता, आकस्मिक घटनांना तोंड देण्यासाठी नियोजन करणे आणि जादा वीज खरेदीचे करार करणे महावितरण कंपनीला अधिकच गरजेचे झाले असून त्यामुळे राज्यातील भार नियमन शिथील करण्यास मदत होईल.

(११) ज्या ग्राहकांनी ऑक्टोबर ते डिसेंबर, २००६ या कालावधीत अतिरिक्त पुरवठा आकाराचा जादा भरणा केला आहे अशा ग्राहकांनाच अतिरिक्त पुरवठा आकाराची वसूल केलेली जादा रक्कम त्याच प्रमाणात परत करण्याचे निदेश महावितरण कंपनीला देण्यात येत आहेत.

(१२) भारनियमनाच्या वेळापत्रकाची अंमलबजावणी योग्य त-हेने होत असल्याची खात्री करून घेण्याकरिता महावितरण कंपनीने स्थापन केलेल्या समित्यांमध्ये अधिका-यांचा भरणा असून आयोगाने दिलेल्या निदेशांप्रमाणे अशा समित्यांमध्ये प्रमुख स्थानिक नागरिकांचा समावेश नाही. अशा समित्यांमध्ये महावितरण कंपनीने प्रमुख स्थानिक नागरिकांचाही समावेश करावा. भार नियमनाच्या कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीत तफावत आढळल्यास त्याबाबतचा अहवाल या समित्या आयोगास दर महिन्याला सादर करतील, याची महावितरण कंपनीने खात्री करावी.

(१३) ग्रीडच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव नियोजित भार नियमन आणि उच्च दाबाचा वीज पुरवठा बंद करुन, भार नियमनाचे तास कोणत्याही

मर्यादेपर्यंत वाढविता येऊ शकतील, असा महावितरण कंपनीचा समज होणे, ही एक चिंतेची बाब आहे. आवश्यक असलेल्या वीज खरेदीची व्यवस्था करण्याऐवजी, भारनियमनाच्या मर्यादेत वाढ सुचविणारे प्रस्ताव महावितरण कंपनी सतत सादर करीत आहे. त्यानुसार ऑगस्ट २००५ च्या आदेशातील ८ तासापासून फेब्रुवारी २००७ च्या आदेशातील १५ तासापर्यंत भारनियमनात वाढ झाली आहे.

(१४) राज्यात नियमितपणे होणा-या भार नियमनामुळे ते आता जीवनातील एक वास्तव बनले असल्याचे ब-याचशा ग्राहकांनी जरी स्वीकारले असले तरी एक विद्युत परवानाधारक या नात्याने सर्व ग्राहकांना २४ तास विजेचा पुरवठा करणे ही कंपनीची प्रमुख जबाबदारी असल्याचे महावितरण कंपनीने या भार नियमनाच्या पार्श्वभूमीवर विसरु नये.

(१५) सतत वाढत जाणारे व नजिकच्या भविष्यात कोणताही दिलासा दृष्टीपथात नसणारे भार नियमन ग्राहकांवर लादण्याचा महावितरण कंपनीला कोणताही उपजत अधिकार नाही. शून्य भार नियमन हे लक्ष्य असावे. त्यासाठी आवश्यक असणा-या सर्व विजेची खरेदी करण्यात येईल, याची खबरदारी महावितरण कंपनीने घ्यावी.

(१६) प्रस्तावित भार नियमनाच्या तासात सुचविलेली वाढ मंजूर करण्यात आली नाही तर अति उच्च दाबाचा वीज पुरवठा बंद करावा लागेल अशी आयोगाला धमकीवजा विनंती करण्यापासून महावितरण कंपनीने स्वतःला परावृत्त करावे. मंजूर केलेली कार्यपध्दती अंमलात असताना देखील अति उच्च दाबाचा वीज पुरवठा बंद करण्याची महावितरण

कंपनीची सवय आहे. ती सवय लक्षात घेता, अति उच्च दाबाचा वीज पुरवठा बंद करण्याची वेळ येऊ नये या कारणास्तव अधिक तासांचे भार नियमन मंजूर करण्यात काहीच अर्थ उरणार नाही. कारण या सर्व समस्येचे मूळ हे महावितरण कंपनीने आवश्यक असलेल्या विजेची खरेदी केली नाही यात आहे.

(१७) आपल्या आकार्यक्षमतेप्रमाणेच महावितरण कंपनीला महानिर्मिती कंपनीच्या अकार्यक्षमतेचा फटका बसला आहे. त्यामुळे हा विजटंचाईचा प्रश्न जास्त बिकट बनला आहे.

(१८) मुंबईतील परवानेधारकांनी टाटा पॉवर कंपनीशी समन्वय साधून दहा दिवसात प्रयत्न करुन सुमारे ४०० मेगावॉट वीज उपलब्ध करुन घेतली आहे. त्यामुळे वेळच्या वेळी आणि जाणीवूर्वक प्रयत्न केल्यास वीज उपलब्ध होऊ शकते, हेच दिसून आले आहे. इच्छा असल्यास, महावितरण कंपनी देखील हे करु शकेल.

(१९) विजेच्या मागणीचे नियोजन करण्यात आणि आवश्यक असलेल्या विजेची खरेदी करण्यात महावितरण कंपनीला अपयश आले असल्याचे यावरुन स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे महावितरण कंपनीने आपल्या चुकीची जबाबदारी स्व:ताच्या शिरावर घेणे आवश्यक आहे. ग्राहकांना वीज मिळण्याच्या हक्कापासून सातत्याने वाढत्या प्रमाणात वंचित करण्याच्या महावितरण कंपनीच्या प्रयत्नामध्ये आयोग सहभागी होऊ

इच्छित नाही. त्यांच्या परवाना क्षेत्रात कराव्या लागणा-या भार नियमनास महावितरण कंपनी पूर्णपणे स्वतःच जबाबदार आहे.

(२०) महावितरण कंपनीने प्रस्तावित केल्याप्रमाणे भार नियमनात आणखी कोणतीही वाढ यापुढे करणे हे सर्व ग्राहकांवर आणि विभागांवार अन्यायकारक ठरेल, आणि आयोग, त्यामुळे, महावितरण कंपनीचा प्रस्ताव पूर्णपणे फेटाळून लावत आहे.

सदर आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

(मालिनी शंकर)
सचिव, मविनिआ

मुंबई,
२३ एप्रिल, २००७